पुढारी

संक्षिप्त



संकेश्वर : सायबर क्राईमबाबत कार्यशाळेत सहभागी विद्यार्थी.

## संकेश्वर कृष्णा कॉलेजमध्ये सायबर जागृती

**संकेश्वर (पुढारी वृत्तसेवा) :** पुणे येथील क्रिक हील फाऊंडेशन व निडसोशी एसजेपीएन ट्रस्ट बीसीए महाविद्यालय यांच्यातर्फे सायबर सुरक्षा जनजागृती कार्यशाळा पार पडली. डिजिटल युगात मोबाईल, इंटरनेट बँकिंग, सोशल मीडियाचा वाढता वापर पाहता सायबर फसवणूक गंभीर समस्या बनली आहे. सुशिक्षित नागरिकही फसवणुकीचे बळी पडत आहेत. सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी संकेश्वर कृष्णा आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज येथे संपदा शेंडे व ऐश्वर्या सपकाळे यांनी ३०० विद्यार्थ्यांशी संवाद साधला. कार्यशाळेत बनावट कॉल, फिशिंग लिंक, बनावट लॉटरी, बक्षीस संदेश, ओटीपी विचारणे, सोशल मीडिया हॅकिंग, ओटीपी शेअर न करणे, संशयास्पद व्यवहार त्वरित थांबवणे व पोलिस हेल्पलाईनला माहिती देण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

Belgaum Edition
Sep 28, 2025 Page No. 02
Powered by: erelego.com